दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १५९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२ सप्टेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

नवी मुंबई खारघर येथे

थ्रीस्टार हॉटेलला लावला २५ लाखांचा चूना

दै.रायगड नगरी । पनवेल

फिल्म इंडस्टीमध्ये एनीमेशन व्हीएफएक्सचे काम करत असल्याचे भासवून एका भामटयाने खारघर मधील थ्रीस्टार हॉटेलमधील दोन डिलक्स रुममध्ये आपल्या १२ वर्षीय मुलासोबत ९ महिने बस्तान मांडून हॉटेल व रेस्टॉरंटचे तब्बल २५ लाख १५ हजार रुपयांचे बिल थकवुन मुलासह पलायन केल्याची घटना उघडकिस आली आहे. मुरली मुरुगेश कामत (४३) असे या भामटयाचे नाव असून खारघर पोलिसांनी या त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम करत असल्याचे भासवून केली फसवणूक

या प्रकरणातील आरोपी मुरली मुरुगेश कामत हा गत २३ नोव्हेंबर २०२० रोजी खारघर येथील हॉटेल थ्रीस्टारमध्ये आपल्या १२ वर्षीय मुलासोबत गेला होता. त्यावेळी त्याने हॉटेलच्या मॅनेजरला आपण फिल्म इंडस्ट्रीमध्ये एनीमेशन व्हीएफएक्सचे काम करत असल्याचे व त्याचे काम काही दिवसात सुरु होणार असल्याचे सांगितले.

तसेच त्याला ६-७ महिन्यासाठी दोन रुमची गरज असल्याचे व सध्या त्याच्याकडे पैसे नसल्याने रुमच्या भाडयाचे पैसे १ महिन्यानंतर देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी त्याने आपले पासपोर्ट जमा करण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे मॅनेजरने त्याची भेट हॉटेल मालक शेट्टी यांच्यासोबत घालुन दिल्यानंर त्यांनी देखील पासपोर्ट घेऊन मुरली मुरुगेश कामत याला हॉटेल मधील रुम देण्यास सांगितले. त्यानंतर भामटया मुरली मुरुगेश कामत याने मागणी केल्यानुसार त्याला रहाण्यासाठी व मिटींगसाठी असे दोन सुपर डिलक्स रुम देण्यात आले.

त्यानंतर भामटया मुरली मुरुगेश कामत याने हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये खाऊन पिऊन दिवस रात्री मुलासह मौज मजा सुरु केली. एक महिना पुर्ण झाल्यानंतर मुरली मुरुगेश कामत याच्याकडे रुमच्या भाडयाची मागणी करण्यात आली असता, त्याने त्याचा आर्थिक व्यवहार पुर्ण झाल्यानंतर रुमचे भाडे देण्याचे त्याने आश्वासन दिले. काही दिवसानंतर मॅनेजरने भामटया मुरली मुरुगेश कामत याला संपर्क साधल्यानंतर त्याने खोपोली येथील इमेजिका विकत घेण्याबाबत त्याचा व्यवहार सुरु असल्याचे व सदर व्यवहार झाल्यानंतर हॉटेलचे बिल देणार असल्याचे सांगितले. याबाबतची माहिती त्याने हॉटेल मालक शेट्टी यांना देखील दिली. त्यामुळे दोन महिने त्याच्याकडे हॉटेलच्या बिलाची मागणी करण्यात आली नाही. मात्र फेब्रुवारी महिन्यामध्ये भामटया मुरली मुरुगेश कामत याने कोरोनामुळे सिंगापुर येथील डी.बी.एस.बँकेचे व्यवहार बंद असल्यामुळे बँकेमधुन पैसे ट्रान्सफर करता येत नसल्याचे कारण सांगत लॉकडाऊन संपल्यानंतर हॉटेलचे बिल देण्याचे आश्वासन दिले.

मे महिन्यात भामटया मुरली मुरुगेश कामत याला संपर्क साधल्यानंतर त्याने ३ चेक देऊन सदर चेक १५ जून नंतर बँकेत टाकण्यास सांगितले. दरम्यानच्या काळात मुरली मुरुगेश कामत याच्याकडे पैसे मागण्यासाठी अनेक व्यक्ती हॉटेलमध्ये येत असल्याचे लक्षात आल्यानंतर तो हॉटेलची फसवणुक करत असल्याचा संशय हॉटेलमधील कर्मचार्यांना आला. त्यानंतर गत १७ जुलै रोजी सकाळी ७ वाजता भामटया मुरली मुरुगेश कामत याने हॉटेलमधील बाथरुमच्या खिडकीतून मुलासह पलायन केले. हॉटेलच्या कर्मचार्यांनी भामटया मुरली मुरुगेश कामत राहत असलेल्या रूमचा दरवाजा डुप्लिकेट चावीने उघडल्यानंतर मुरली मुरुगेश कामत मुलासह पळून गेल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. त्यानंतर हॉटेलच्या मॅनेजरने या भामटया विरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

कोविडचे निर्बंध पाळून गणेशोत्सव आनंदाने साजरा करू : ना.आदिती तटकरे

गणेशोत्सव २०२१ पूर्वतयारी व जिल्हा शांतता समितीची आढावा बैठक

दै.रायगड नगरी । अलिबाग

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी कोविडचे निर्बंध पाळून गणेशोत्सव आनंदाने साजरा करू या, असे आवाहन पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले.

गणेशोत्सव २०२१ पूर्वतयारी व जिल्हा शांतता समितीची आढावा बैठक आज नियोजन भवन बैठक सभागृहात संपन्न झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार बाळाराम पाटील, जिल्हा शांतता समितीचे सदस्य, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे तसेच महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, जिल्हा परिषद, राज्य परिवहन अशा विविध शासकीय विभागांचे विभागप्रमुख, कार्यालयप्रमुख आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी गणेशोत्सव २०२१ च्या तयारीच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, राज्य परिवहन महामंडळ, आरोग्य, पोलीस, अन्न व औषध प्रशासन, कोकण रेल्वे, मेरीटाईम बोर्ड, रस्ते वाहतूक अशा विविध विभागांनी केलेल्या तयारीची सविस्तर माहिती जिल्हा शांतता समितीच्या सदस्यांना दिली.

बैठकीच्या सुरुवातीस अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ यांनी जिल्हा शांतता समितीच्या बैठकीचा हेतू तसेच गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाने केलेल्या तयारीबाबत उपस्थित सर्वांना माहिती दिली. शेवटी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी सर्वांचे आभार मानून येणारा गणेशोत्सव शासनाने नेमून दिलेले निर्बंध पाळून, स्वत:च्या व इतरांच्याही आरोग्याची काळजी घेत उत्साहाने साजरा करू, असे आवाहन केले.

जिल्हा शांतता समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष बैठक घेतल्याबद्दल पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचे आभार मानले तसेच या सदस्यांनी राष्ट्रीय महामार्ग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांच्या दुरूस्तीबाबत, ग्रामपंचायत हद्दीतील पथदिवे सुरू करण्याबाबत, कोविडची संभाव्य तिसरी लाट व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची कोविड तपासणी व लसीकरण, इत्यादी विषयांबाबत चर्चा केली. त्यावर पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी संबंधित शासकीय विभागांकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत समिती सदस्यांना माहिती दिली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी ही प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले.

संक्षिप्त...

१२ आमदारांच्या नियुक्तीबाबत राज्यपालांशी चर्चा : उपमुख्यमंत्री

दै.रायगड नगरी । मुंबई

१२ आमदारांच्या विधान परिषदेवरील नियुक्तीच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. मुख्यमंत्री ठाकरे यांच्याबरोबर राष्ट्रवादी कांग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कॉंग्रेसचे नेते, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात हे देखील होते. १२ आमदारांच्या नियुक्ती करण्याबाबतच्या शिफारशीला दीर्घकाळ लोटला असून आता राज्यपाल कोश्यारी यांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपालांना केल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

राज्यपाल कोश्यारी यांची भेट घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूल मंत्री अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी राज्यपालांना आमदारांच्या नियुक्तीलर लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती केल्याचे पवार यांनी सांगितले.

१२ आमदारांच्या यादीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते एकनाथ खडसे आणि स्वाभीमानी पक्षाचे नेते राजू शेट्टी यांची नावे वगळण्यात येतील अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. एकनाथ खडसे यांची ईडी चौकशी करत असून शेट्टी यांच्याविरोधातही एका प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यामुळे राज्यपालांचा या दोन नावांवर आक्षेप आहे अशी चर्चा ऐकायला मिळत होती. मात्र, अशा प्रकारची कोणतीही चर्चा झाली नसल्याचे अजित पवार यांनी सांगितले. आम्ही राज्यातील अनेक मुद्द्यांवर चर्चा केली असून आमदारांच्या नियुक्तीचा मुद्दा केवळ लवकर निर्णय घ्यावा या अंगानेच चर्चिला गेला असे पवार म्हणाले.

कोलाड येथे खैर वाहतूक करणारा ट्रक वनरक्षकांच्या जाळ्यात

दै.रायगड नगरी । कोलाड

मुंबई-गोवा हायवेवरील कोलाड सुपर मार्केट जवळ अवैध खैर वाहतूक करणारा ट्रक कोलाड वनरक्षक अधिकारी यांनी सापळा रचून पकडा आहे.

सविस्तर वृत्त असे कि बुधवार दि.१सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भिवंडी येथील पडगा येथून चिपळूण सावर्डे येथे खैर भरून जाणारा ट्रक गाडी नंबर GJ15, -T 7851 हा कोलाड येथील सुपर मार्केट जवळ वनरक्षक अधिकारी कांबळी व अजिंक्य कदम यांनी सापळा रचून पकडले असुन वनरक्षक अधिकारी यांनी वाहनचालक नजमुद्दीन याला ताब्यात घेतले असुन अधिक तपास वनरक्षक अधिकारी करीत आहेत.

पाणी पुरवठा संदर्भात सिडकोमध्ये महत्वपूर्ण बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

खारघर, कामोठे, कळंबोली व नवीन पनवेल येथील पाणी पुरवठा समस्यांबाबत तसेच भविष्यकालीन पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सूचित केल्याप्रमाणे सिडकोने दखल घेतली. त्या अनुषंगाने आज(बुधवार, दि. ०१) सीबीडी बेलापूर येथे सिडको भवनात महत्वपूर्ण बैठक झाली.

> मी अध्यक्ष पदाच्या कार्यकाळांत देखील याबाबतीत अनेक बैठका घेऊन पाणी पुरवठा नियोजनाबाबत वेळोवेळी सूचना दिल्या होत्या. परंतू दुर्दैवाने आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे नियोजन सिडकोमार्फत केल्याचे दिसून येत नाही, असे त्यांनी नमूद करत सिडको प्रशासनाच्या या नियोजनशून्य कारभारामुळे ऐन पावसाळ्यांत नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोष आहे. वेळीच उपाययोजना न झाल्यांस सिडकोविरोधात नागरिकांच्या असंतोषाचा उद्रेक होण्याची शक्यता आहे. नागरिकांच्या भावनांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे, त्यामुळे सिडकोने तातडीने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे.
>
> **: आ.प्रशांत ठाकूर**

आमदार प्रशांत ठाकूर, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर विक्रांत पाटील, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, अनिता पाटील, समीर ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, बबन मुकादम, अभिमन्यू पाटील, एकनाथ गायकवाड, तेजस कांडपिळे, अमर पाटील, विकास घरत, प्रविण पाटील, निलेश बाविस्कर, नगरसेविका राजेश्री वावेकर, कुसूम म्हात्रे, तसेच सिडकोचे अधिकारी उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून खारघर, कामोठे, कळंबोली, नविन पनवेल येथील काही विभागांमध्ये अत्यंत अनियमित पाणी पुरवठा होत असून नागरिकांना तीव्र

◀ .../४

मोरा-भाऊचा धक्का सागरी मार्गावरील तिकिट दरवाढ कायम करण्याची मागणी

मंजुरी दिल्यास दैनंदिन प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांचे कंबरडे मोडणार

दै.रायगड नगरी । उरण

मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात पावसाळी हंगामात करण्यात आलेली २ रुपयांची वाढ कायम करण्याची मागणी मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडे केली आहे.तिकिट दर कायम करण्यास मंजुरी दिल्यास या सागरी मार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे कंबरडे मोडणार आहे.

दरवर्षी १ जुन ते ३१ऑगस्ट या दरम्यानच्या पावसाळी हंगामात मोरा- भाऊचा धक्का या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक तिकिट दरात भरमसाठ वाढ केली जाते. मागील वर्षीही तिकिट दरात १५ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यामुळे प्रवाशांना तिकिटासाठी ७० रुपये मोजावे लागत होते. यावर्षीही मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेने पावसाळी हंगामासाठी तिकिट दरात ७० रुपयांवरुन ९० रुपयांपर्यंत वाढ केली आहे.

हाफ तिकिट दरातही ३३ रुपयांवरुन ४४ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. ही दरवाढ २६ मे पासूनच लागु करण्यात आली होती.आता १ सप्टेंबर पासून पावसाळी हंगामासाठी करण्यात आलेली तिकिट दरवाढ कायम करण्याची मागणी मुंबई जलवाहतूक

◀ .../४

सुभाष देसाईंच्या उपस्थितीत शेकापचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसेना नेते तथा राज्याचे उद्योग व खनिकर्म मंत्री तसेच संपर्क नेते कोंकण विभाग सुभाष देसाईंच्या उपस्थितीत बेलवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांच्यासह शेकापच्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

शिवसेना पक्ष प्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होवून शिवसेना नेते तथा राज्याचे उद्योग व खनिकर्म मंत्री तसेच संपर्क नेते कोंकण

◀ .../४

तळे येथील श्री राधाकृष्ण नामदेव मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात संपन्न

दै.रायगड नगरी । तळा

श्री देव राधाकृष्ण नामदेव शिंपी समाज तळें या संस्थेला सुमारे २०० वर्षापूर्वीची परंपरा लाभलेली असताना या संस्थेच्या माध्यमातून विविध धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, आरोग्य विष यक विविध अनेक उपक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जाते. या संस्थेचा महत्वाचा उत्सव म्हणजे श्रीकृष्ण जन्मोत्सव.

हा उत्सव दरवर्षी नेहेमीप्रमाणे श्रावण कृष्ण षष्टी ते श्रावण कृष्ण दशमी असा पाच दिवस म्हणजे दि. २८/०८/२०२१ ते ०१/०९/२०२१ पर्यंत साजरा करण्यात येतो. दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वां. देव बसविणे म्हणजे पुण्याहवाचनाचा कार्यक्रम सालकरी व्यवस्थापक श्री नितीन रामचंद्र मुद्रांळे यांनी सपत्नीक पार पाडला. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होते. सायंकाळी भजन रात्रौ ह. भ. प. धनंजय बुवा गद्रे (सुधागड - पाली) यांचे सुश्राव्य कीर्तन. यांना हार्मोनियम ची साथ श्री मंदार भावे (रोहा) तर तबला साथ रोहित भागवत, किरण सातांबेकर, आदित्य देशमुख यांनी उत्तम प्रकारे दिली. सतत पाच दिवस भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला. दि. ३० ऑगस्ट रोजी जन्मोत्सवाचे कीर्तन, दि. ३१ ऑगस्ट रोजी गोपाळकाला व रात्रौ काल्याचे कीर्तन तर दि. १ सप्टेंबर रोजी लळिताचे कीर्तन, विद्यार्थी गुणगौरव व विशेष कार्य करणार्या मान्यवरांचा सन्मान असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

महाप्रसाद श्री. ऋषिकेश बारटक्के व धनंजय पवार यांनी दिला होता. तर विद्यार्थी गुणगौरव सोहळा युवक मंडळाचे मार्गदर्शनाखाली यशस्वी पणे पार पडला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष महेंद्र कजबजे, उपाध्यक्ष प्रकाश मेकडे, सचिव नमित पांढरकामे, खजिनदार श्रीराम कजबजे, सालकरी व्यवस्थापक नितीन मुद्रांळे, विश्वस्त रविंद्र वाईकर, सतिश मुद्रांळे, प्रकाश दलाल, प्रमोद मेकडे, सूर्यकांत रोडे, जि. संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, चंद्रकांत रोडे, रघुनंदन रोडे, युवक मंडळाचे अध्यक्ष मितेष मुळे, उपाध्यक्ष प्रसाद बारटक्के, सचिव प्रणव मेकडे, खजिनदार सचिन मुद्रांळे, निलेश पांढरकामे, विवेक कजबजे, संजय कजबजे, विजय लिमकर, दत्तात्रय अवसारे, महिला मंडळ अध्यक्षा सौ. निता रोडे, उपाध्यक्षा सौ. वसुधा रोडे, सचिव मनाली डोळस, सालकरी व्यवस्थापिका सौ. मुद्रांळे यांचे सह सर्वच समाज बांधव - भगिनींनी उत्तम सहकार्य केले. मंदिरात उत्तम विद्युत रोषणाई केल्याने सर्व वातावरण प्रसन्न व भक्तिमय पहावयास मिळत होते. अतिशय आनंदी वातावरणात हा कार्यक्रम कोविडचे नियम पाळून पार पडला.

सारडे कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सेंटरचे वृक्षारोपण

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यातील सारडे येथील कोंमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे कोप्रोली येथील साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी सेंटर यांच्या वतीने वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

सारडे येथील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क परिसरात निसर्ग समतोल राखणे आणि सामाजिक वनीकरण म्हणून वृक्षारोपण करण्यात आले.

माणुस आज आधुनिक युगाकडे वाटचाल करीत असला तरी निसर्ग हाच खरा देव आहे आणि म्हणूनच या साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी कोप्रोली तर्फे कोमनादेवी ऑक्सिजन पार्क सारडे आपल्या विद्यार्थी राकेश पाटील यांनी आपल्या निसर्ग समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण केले.

पोलादपूर तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांची बदली

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांची सातारा जिल्हा परिषदेमध्ये मोहिम अधिकारीपदी बदली झाल्याने पोलादपूर तालुका कृषी कार्यालयामधील कर्मचारी वृंदाने निरोप दिला आहे. यावेळी कैलास धुमाळ यांच्या प्रेमळ स्वभावाने भारावलेल्या कर्मचारीवर्गाने त्यांचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेत त्यांच्यावर पुष्पवृष्टीदेखील केल्याने पोलादपूर तालुक्यात हा निरोप समारंभ अभूतपूर्व ठरला आहे.

गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळामध्ये तालुका कृषी अधिकारी कैलास धुमाळ यांनी त्यांच्या कार्यक्षमतेद्वारे तालुक्यातील विविध भागातील शेतकऱ्यांना लागवडीसाठी प्रोत्साहित करून प्रयोगशीलता वाढीस लावून शेतकऱ्यांचे कौतुक करणारे अधिकारी असा लौकीक प्राप्त केला. पोलादपूर शहरामध्ये आठवडा बाजार तसेच भाजीपाल्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी कैलास धुमाळ यांनी केलेल्या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत राहिले. महाड येथील उपविभागीय कृषी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभारदेखील सक्षमपणे पेलून कैलास धुमाळ यांनी त्यांची कार्यक्षमता सिध्द केली आणि पोलादपूर तालुक्यात गेल्या २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीकाळात वाहून गेलेल्या शेतजमिनींसह शेतातील लागवडीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून दिलासा देण्याचे कामदेखील कैलास धुमाळ यांनी कर्मचारीवर्गाच्या सहकार्याने तत्परता दाखविली. यामुळे पोलादपूर तालुक्यात प्रथमच असा सक्षम कृषी अधिकारी लाभल्याचे शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त होत राहिले. या सर्व गुणसंपन्नतेमुळे तालुका कृषी कार्यालयामधील कर्मचाऱ्यांनी कैलास धुमाळ यांचे चरणस्पर्श घेऊन आशीर्वाद घेत त्यांच्यावर फुलांची उधळण करून निरोप दिला. यावेळी पोलादपूर तालुका कृषी कार्यालयातर्फे त्यांना भेटवस्तू देण्यात आली.

श्री.भाकरे सो.कोर्ट
प्रो.जमा.६-२५
अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गडगे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१००३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

१) श्री.परमानंद वामन दापोलकर
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.अक्षय वामन दापोलकर
वय : २६ वर्षे, व्यवसाय : शेती
३) सौ.लता हरिश्चंद्र पाटील
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी लता वामन दापोलकर
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व अर्जदार रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.बेबीबाई उर्फ करुणा वामन दापोलकर ही दि.१३/०६/२०२० रोजी मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावल्या असून तीचे व सहहिस्सेदार ह्यांचे नावे मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

मिळकतीचे वर्णन

अ.क्रं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	१६७	२	०-५९-६० पो.ख. ०१२२०	५.८७
२	१९६	३/अ/३	०-२-०	०.९
३	१७८	६	पो.ख. ०-२-०	०.०
४	१६४	१३	०-३१-० पो.ख. ०-१-०	१.००

कै.बेबीबाई उर्फ करुणा वामन दापोलकर यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

पाणी पुरवठा संदर्भात सिडकोमध्ये महत्वपूर्ण बैठक संपन्न

पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने पाणी पुरवठा नियमित होण्याकरिता तसेच भविष्यकालीन पाणी पुरवठयाचे नियोजन करण्यासाठी सातत्याने भाजपाचे विविध नगरसेवक सिडको प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न पत्रव्यवहार व बैठकांच्या मार्फत करीत आहेत. सिडको या महत्वाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत नाही आणि ही वस्तुस्थिती असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठकीत अधोरेखित केले.

सिडको परिसरात वाढती लोकसंख्या पाहता या ठिकाणी पाण्याचे सोर्सेस वाढविण्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करण्याची गरज असल्याचे कैलास शिंदे यांनी मान्य केले असून आवश्यक ठिकाणी नवीन जलकुंभांची उभारणी, जीर्ण पाईपलाईन बदली करण्याचेही काम हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर दीर्घकालीन उपाययोजनेसाठी टाटा कन्सलटंट यांचे सहकार्य तसेच स्काडा सिस्टीमची अंमलबजावणी करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मोरा-भाऊचा धक्का सागरी मार्गावरील तिकिट दरवाढ कायम करण्याची मागणी

औद्योगिक सहकारी संस्थेने मेरिटाईम बोर्डाकडे केली असल्याची माहिती मोरा बंदरचे निरिक्षक प्रभाकर पवार यांनी दिली. मात्र तिकिट दर कायम करण्यास मंजुरी दिल्यास या सागरी मार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांचे कंबरडे मोडणार आहे.

मागील काही वर्षांपासून डिझेल दरात सातत्याने भरमसाठ वाढ होत चालली आहे. ६८ रुपये प्रति लिटर दराने मिळणाऱ्या डिझेलसाठी आता ९० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे पावसाळी हंगामासाठी करण्यात आलेली तिकिट दरवाढ कायम करण्याची मागणी करण्यात आली असल्याची माहिती मुंबई जलवाहतूक औद्योगिक सहकारी संस्थेचे सचिव शराफत मुकादम यांनी दिली.महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या मंजुरी नंतरच दरवाढ कायम करण्यात येणार असल्याचेही मुकादम यांनी स्पष्ट केले.

सुभाष देसाईंच्या उपस्थितीत शेकापचे शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

विभाग सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड पनवेल शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाचे बेलवली ग्रामपंचायतचे माजी सरपंच नरेश पाटील, माजी उपसरपंच वारदोली अरुण पाटील यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य बेलवली महेंद्र म्हात्रे, विनायक पाटील, सुनाद पाटील, दिनेश ढोपरे, दत्ता पाटील, रोहित पाटील, आतिष मोकल, प्रथमेश ढोपरे व वार्दोली ग्रामपंचायत सदस्य चे रविंद्र शेळके यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. या प्रसंगी सुभाष देसाई यांनी सर्व कार्यकर्त्यांच्या हाती शिवबंधन बांधून शिवसेना पक्षात स्वागत केले. या वेळी शिवसेना तालुका संघटक भरत पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, विभाग प्रमुख नंदू घरत आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात लसीकरण केंद्रावर रात्रभर नागरिकांच्या रांगा

नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्याची रामदास शेवाळे यांची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात लसीकरण केंद्रावर रात्रभर नागरिकांना रांगा लावून उपस्थित रहावे लागत आहे. तरी या नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून आरोग्य केंद्रांवर तसेच इतर ठिकाणी कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी उपलब्ध लसी प्रमाणे नागरिकांना लस दिली जाते. वास्तविक पाहता एकूण लोकसंख्या आणि मिळणारी लस यांच्या प्रमाणामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे केंद्रावर लस घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये लसीकरण केले जात असले तरी त्या ठिकाणी शुल्क आकारले जात आहे. कोरोना वैश्विक संकटामध्ये आर्थिक स्थिती बेताची झाल्याने अनेक कुटुंबांना पैसे देऊन लस घेणे शक्य होत नाही. त्यामुळे ते शासकीय लसीकरण केंद्रावर मोफत लस देण्यास प्राधान्य देत आहेत. अल्प उत्पादन गट आणि सर्वसामान्य कुटुंबातील अनेक जण येथे रांगा लावून लस घेतात. कळंबोली येथील गुरुद्वारा समोरील लसीकरण केंद्रावर रात्री बारा वाजल्यापासून नागरिक रांगा लावत आहेत. अशीच परिस्थिती एकंदरीत पालिका क्षेत्रातील सर्वच केंद्रावर आहे. कोरोना प्रतिबंधात्मक लस घेण्यासाठी हे नागरिक संपूर्ण रात्र रस्त्यावर जागून काढतात. डासांचा उपद्रव त्यांना सहन करावा लागतो. धुळीचा त्रास संबंधितांना होतो त्याचबरोबर पाऊस येत असल्यास छत्री घेऊन तेथेच थांबावे लागते. सकाळी आठ वाजता त्यांना टोकन वाटप केले जाते. दरम्यान लसीकरण केंद्रामध्ये खुर्च्या त्याच बरोबर बसण्यासाठी व्यवस्था आहे. त्या ठिकाणी लाईट आणि फॅन ची सोय सुद्धा आहे. मात्र येथील कर्मचारी नागरिकांना आत मध्ये प्रवेश करून देत नाहीत. परिणामी मोठया गैरसोयीला आणि त्रासाला त्यांना सामोरे जावे लागते. इतर वसाहतींमध्ये ही थोड्याफार फरकाने हीच स्थिती आहे. यासंदर्भात पनवेल महानगरपालिकेने योग्य त्या उपाययोजना करून नागरिकांची गैरसोय होणार नाही यासंदर्भात लक्ष केंद्रित करण्यात यावे अशी मागणी शिवसेना महानगर प्रमुख रामदास शेवाळे यांनी पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे. तसेच लसींचा साठा वाढवण्यासाठी पनवेल महापालिका प्रशासनाने पाठपुरावा आणि प्रयत्न करावेत अशी न्याय मागणी सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने आपल्याकडे करीत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती करीत आहे. अन्यथा नागरिकांच्या गैरसोयी विरोधात आम्हाला महापालिका प्रशासना विरोधात आंदोलन करावे लागेल असा इशारा रामदास शेवाळे यांनी दिला आहे.

कोविड १९ ईसीआरपी-२ अंतर्गत भरण्यात आलेल्या परिचरिकांच्या नेमणूका रद्द

दै.रायगड नगरी । मुरुड

राज्यामध्ये मार्च २०२० पासून कोविड १९ चा प्रादुर्भाव वाढल्याने राज्यात सर्वत्र कोविड साथीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनातर्फे कोविड-१९ एउठ्ड्ढ-१ अंतर्गत मनुष्यबळ मंजूर करण्यात आले होते, त्या अनुषंगाने मुरुड ग्रामीण रुग्णालयात तीन परिचारिकांची भर्ती करण्यात आली होती, परंतु सध्याच्या कोरोनाच्या येणाऱ्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी केंद्र शासनातर्फे कोविड-१९ ECRP-2 बजेट अंतर्गत मनुष्यबळाकरिता लागणार निधी मंजूर करण्यात आलेला नसल्याने भर्ती करण्यात आलेल्या तीन परिचारिकेंच्या नेमणुका रद्द करण्यात आल्याने कामाचा प्रचंड ताण वाढला आहे, सध्या मुरुड ग्रामीण रुग्णालयात एक कायमस्वरूपी स्टाफ नर्स व एक डेप्युटेशनवर नर्स एवढाच नर्सिंग स्टाफ आहे, गणेशोत्सव सण साजरा करण्यासाठी बरेचसे चाकरमानी तालुक्यात येत असतात त्यामुळे कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा धोका आहेच तसेच रुग्णालयाच्या लसीकरण केंद्रावर लसीकरणही सुरू आहे , त्यामुळे येथे स्टाफ कमी पडत आहे, कोरोनाचा संसर्ग वाढलेल्या काळात झटून काम केलेल्या परिचारीकांवर पदं रद्द केल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे.

जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे कि, रूम नं.१०, प्लॉट क्र. ए- ४३, आकाश गंगा को-ऑप.हौ.सोसायटी लिमिटेड. सेक्टर-१२, खारघर, ता.पनवेल जि.रायगड या पत्त्यावर ३२ चौरस मीटर चा रो हाऊस श्री.विवेक आत्माराम शंखपाल यांचे नावे सिडको बी.यु.डी.पी योजने अंतर्गत प्राप्त व स्थित आहे.

सदर युनीट रो हाऊस संबंधी आमचे अशिलांनी मिळकतीचे मालक श्री.विवेक आत्माराम शंखपाल यांच्याशी मिळकत विकत घेणे संबंधी अंतीम बोलणी केलेली आहे व ठराव केला आहे. श्री.विवेक आत्माराम शंखपाल यांनी सदर रो हाऊस आमचे अशिलांना ठरलेल्या रकमेत सर्व प्रकारे दावेमुक्त, मागण्यांपासून मुक्त विकण्याचे मान्य केलेले आहे.

सदर रो हाऊस / यूनिट व त्याच्या कोणत्याही भाग संबंधाने कुणाही व्यक्तीस विक्री, बदली, असाईन्मेंट, गहाणवट, अधिभार, शुल्क, नावे करणे, बक्षीस, न्यास, वारसा, व्यवसाय, ताबा, मालकी, भाडेपट्टी, पोट-भाडेपट्टी, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, लीज, सबलीज, लीन, देखरेख, बीक्वेस्ट वारसा, फॅमिली असाईन्मेंट, सेटलमेंट, कायदेशीर कारवाई, दिवाळखोरी, व कोणत्याही न्यायालयाचा निकाली आदेश व अन्य कोणत्याही प्रकारे कसलाही भाग हक्क, दावा, लाभ, स्वारस्य, आक्षेप अथवा मागणी असल्यास त्यांनी तो द्रुपया लेखीस्वरूपात त्या पुष्ट्यर्थ मुळ कागद पत्रासह निम्न स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील पत्त्यावरील कार्यालयात ही नोटीस जारी झाल्यापासून १५ दिवासांचे आत रविवार सोडून सकाळी १० ते सायं ५ पर्यंत दाखल करावेत. अन्यथा अशा व्यक्ती व व्यक्तींचे दावे, हक्क सोडून देण्यात आल्याचे आणी / अथवा दुर्लक्षित केल्याचे समजण्यात येईल. व आमचे अशिल सदर युनीट रो हाऊस संधर्भात पुढील खरेदीव्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कुणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही तसेच माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दि.०२/०९/२०२१

सही/-
ॲड.जे. बी. शिकलगार
(खरेदीदाराचे वकील)
गाळा क्र.२, प्लॉट क्र.सी-२,
ज्ञानसारथी सह.गृह.संस्था मर्या.
सेक्टर-१२,खारघर, नवी मुंबई.
संपर्क क्र. ९३२३८६७६१४

राव साहेब
प्रो.जमा.६-२५
अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गणेश गडगे/ॲड.सागर गोंधळी

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०९१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.११/१०/२०२१

१) श्री.अशोक रामदास गडगे
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.अनुसया धोंडू पाटील
वय : वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.दहिसर, ता.जि.ठाणे अर्जदार

ज्याअर्थी कै.रामदास काथारी गडगा उर्फ गडगे हे दि.३०/०८/२०२० रोजी मौजे : टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : टेंभोडे व आंबेतखार, ता.पनवेल, जि.रायगड

अ.क्रं.	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	टेंभोडे-२२	९१	४	१-०२-००
२	टेंभोडे-२२ ए	६७	५	०-८-४
३		६७	१+६ B	०-११-७
४	टेंभोडे-२२ बी	६८	१ (३)	०-३३-६ पो.ख.०-२-५
५	टेंभोडे-११८ B	६६	१/३	०-०५-००
६		६६	१/४	०-०५-००
७		६६	१/७	१-०५-१२
८	आंबेतखार १६	१६+१७ ते ७९+१३० ते १४१+१४७ ४३८	३२४	०-३६-४
९		Do	३३२	०-५०-६

कै.रामदास काथारी गडगा उर्फ गडगे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

राव साहेब
प्रो.जमा.६-२५
अर्जदाराचे वकील
ॲड.विजय गडगे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.९८२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०९/२०२१

१) श्री.परमानंद वामन दापोलकर
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.अक्षय वामन दापोलकर
वय : २६ वर्षे, व्यवसाय : शेती
३) सौ.लता हरिश्चंद्र पाटील
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी लता वामन दापोलकर
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व अर्जदार रा.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

ज्याअर्थी कै.वामन जानू दापोलकर हे दि.१५/०२/२०२० रोजी मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांचे राहत्या घरी मृत्यू पावले असून त्यांचे नावे मौजे : पाडेघर, वहाळ, सोनखार, बंबावी, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

मिळकतीचे वर्णन

अ.क्रं.	युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	पाडेघर/४०	१ डी	०	०-१-०
२	पाडेघर/२६	१ बी	४	०-८-०
		१ सी	६	०-८-०
३	वहाळ/३६१	४८४	४	१-४४-०
		४७२	२	
		५४४	३	
		५२४	३	
		५२१	६	
		५२०	५	
		५१८	२	
		५१६	१	
		५०४	२	
		४७१	४	
४	वहाळ/३३२ बी	७	१८	०-२-८
५	वहाळ/३३२ सी	३९	३	०-१५-०
		२२७	४	०-८-०
६	वहाळ/५७५	५२८	२	०-५-०
७	सोनखार/१२६	१६	२	०-७-९
		१६	४	०-५-३
		१७	८	०-३-५
		१७	११	०-६-०
		१८	९	०-६-१
		२०	३०	०-६-६
८	सोनखार/७१/१	१३	१	०-१३-७
		१३	७	०-५-०
		१५	१३	०-१५-०
		२१	१७	०-१-३
		२१	१८	०-५-६
		२३	९	०-१९-०
		२३	१८	०-१-३
		२०	३४	०-२-५
९	सोनखार/६२	२१	९	०-२१-८ पो.ख.०-१-०
		२१	१४	०-८-१ पो.ख.०-०-५
१०	उलवे/११	९७	१ पै	१-१६-८
		९६	११	१-२०-०
११	बंबावी/३८	५	३	०२१२

कै.वामन जानू दापोलकर यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २६/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

कान्हा जानु सांबरी सेवानिवृत्त

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषदेत मागील तीस वर्षांपासून अत्यंत इमानेइतबारे सफाई कामगार म्हणून कार्यरत असणारे कान्हा जानु सांबरी हे आज दि.१ सप्टेंबर रोजी आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. यावेळी त्यांचा नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तर कामगार वर्गाने सुध्दा त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. स्वच्छता बाबतीत कोणतेही काम विना संकोच करण्यात कान्हू सांबरी यांचा हातखंडा होता. त्यामुळे ते गावात सर्वांच्या परिचयाचे आणि आवडते व्यक्तिमत्त्व होते. सत्कार समारंभावेळी त्यांच्या पत्नी सुध्दा आवर्जून उपस्थित होत्या तर नगरपरिषद कार्यालय अधीक्षक रणजित कांबळे, आरोग्य विभागाचे सदानंद इंगळे, लेखापाल राजेश रांजणे, अकाऊंट विभागाचे अंकुश ईचके,अभियंता अभिमन्यू येळवंडे, लिपिक नरेन्द्र धनावडे, अन्सार महापुळे,वर्तक,अजय साळुंखे,लक्ष्मण दरवडा यांसह कामगार वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

समस्या मार्गी लावून विकास साधण्यासाठी ग्रामस्थांसह सर्व पक्ष एकवटले

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

गावाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर राजकीय मतभेद न बाळगता एकत्रितपणे काम केले पाहिजे या जाणिवेतून जांभुळपाडा जिल्हा परिषद संघर्ष समितीची स्थापना नुकतीच करण्यात आली आहे. विविध मूलभूत समस्या सोडवून गावांच्या विकासासाठी ग्रामस्थांसह सर्व पक्ष या संघर्ष समितीमध्ये सहभागी झाले आहेत.

परळी ग्रूप ग्रामपंचायत कार्यालयात सर्वपक्षीय आयोजित बैठकीत जांभूळपाडा जिल्हा परिषद संघर्ष समिती ची कमिटी निवडण्यात आली आहे. यावेळी राजकारण विरहित काम करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे. या बैठकीसाठी सरपंच संदेश कुंभार हे अध्यक्ष होते. तर आभार आणि प्रस्तावना अँड भाई कुंभार यांनी केले. या बैठकीत वीज, पाणी रस्ते आदी समस्यांबाबतीत चर्चा करण्यात आली. तसेच तत्काळ एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्या कडून काम का थांबले आहे याची माहिती घेतली. याबरोबरच महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले गेले. यापुढे संघर्ष समिती विविध समस्या व मागण्यांचे निवदने तयार करून संबंधित अधिकाऱ्यांना देऊन समस्या सोडविणार आहे. ही समिती गठित करण्याचे काम प्रामुख्याने विठ्ठल सिन्दकर यांनी केले आहे. खऱ्या अर्थाने राजकारण बाजूला ठेऊन विकासकामांच्या बाबतीत ही समिती संघर्ष करणार आहे. असे यावेळी राहुल गायकवाड यांनी सांगितले.

कार्य शाळा मार्गदर्शन शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

कोकण कृषी विज्ञान केन्द्र किल्ला रोहा यांचे मार्गदर्शनाने संयोजक सुधागड कृषी मित्र संघटना व ग्रुप ग्राम पंचायत सिद्धेश्वर यांचे सहयोगाने रायगड जिल्हा परिषद डिजिटल शाळा सिद्धेश्वर येथे घेण्यात आले. या कार्यक्रमात तालुक्यातील मत्स्य शेती व्यवसाईक व मत्स्य शेती सुरू करण्यास उत्सुक शेतकरी उपस्थित होते. यावेळी प्राध्यापक माधव गीते सर, मत्स्य बीज विशेषज्ञ व प्रा.जीवन आरेकर यांनी चित्रफीत द्वारे मत्स्य शेती मत्स्य उत्पादन संगोपन विक्री मार्गदर्शन केले. सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी आपल्या मार्गदर्शनात आपला सुधागड तालुका मत्स्यव्यवसायास अनुकूल असून यांस लागणारे शासकीय सहकार्य व योजना यांचा लाभ सर्वांनी घ्यावा, समाज उपयोगी कृषी विषयक उपक्रम त्वरित राबवण्याचे व सुरू करण्याचे प्रतिपादन केले.

या प्रसंगी कृषी क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी तहसीलदार सुधागड दिलीप रायन्नावार, गट विकास अधिकारी यादव सर, प्रा. माधव गीते प्रा .जीवन आरेकर ,तालुका कृषीअधिकारी वाळके सर, काझी ॲग्रो प्रोडक्टचे तबरेझ काझी कार्यतत्पर सरपंच ग्राम पंचायत सिद्धेश्वर उमेश यादव, उपसरपंच योगेश सुरावकर, ग्राम सेवक टी. ऐ गोरड, पोलीस पाटील सुनील पोंगडे, आदींनी कार्यक्रम यशस्वी करणेकरिता सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधागड कृषी मित्र संघटनेचे शरद गोळे सर यांनी केले.

चेन स्नॅचींग करणाऱ्या लुटारूंच्या कारवायात पुन्हा वाढ

चेन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारूंची महिलांमध्ये दहशत

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चैन स्नॅचिंगच्या घटना सुरुच असून या लुटारुंनी मागील काही दिवसापासून पनवेल परिसरासह नवी मुंबईत हैदोस घातला आहे. या लुटारुंनी चार दिवसांमध्ये ४ महिला व २ पुरुष अशा ६ जणांच्या अंगावरील लाखो रुपये किंमतीचे दागिने लुटून नेले आहेत. विशेष म्हणजे या लुटारुंनी नेरुळ आणि सानपाडा भागात अवघ्या तासाभरात चार महिलांचे दागिने लुटल्याचे उघडकिस आले आहे. पोलिसांकडून या लुटारुंचा शोध घेण्यात येत असला तरी, या लुटारुंच्या कारवायात पुन्हा वाढ झाल्याने महिला वर्गात या लुटारुंची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे. तर चेन स्नॅचिंगच्या वाढत्या घटनांमुळे पोलिसांची झोप उडाली आहे.

चेन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारूंनी गुरुवार दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास नेरुळ सेक्टर-२१ मध्ये मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या बिंदु नायर (४६) या महिलेच्या गळ्यातील ३० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचुन पलायन केले. त्यानंतर या लुटारुंनी काही वेळातच नेरुळ सेक्टर-२० मध्ये मेघा बाजिराव पवार या महिलेच्या गळयातील ३० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचली. त्यानंतर सदर लुटारूंनी जुईनगर च्या दिशेने पळुन जात सेक्टर-२४ भागात मॉर्निंग वॉक करणाऱ्या सुरेश जाना पाटील यांच्या गळ्यातील ७५ हजार किंमतीचे सोन्याचे लॉकेट खेचुन सानपाडाच्या दिशेने पलायन केले.

त्यानंतर या लुटारूंनी सानपाडा भागात जाऊन डी-मार्टच्या पाठीमागील रोडवर मॉर्निंग वॉक करत असलेल्या मंजुळा राजु शेखर (४४) यांच्या गळ्यातील तब्बल १० तोळे वजनाचे सुमारे ३ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसुत्र खेचुन पलायन केले. या सर्व घटनांची नेरुळ आणि सानपाडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

त्यानंतर चेन स्नॅचींग करणाऱ्या लुटारुंनी २७ ऑगस्ट रोजी दुपारी छोटा खांदा गावच्या दिशेने पायी चालत जाणाऱ्या स्वाती हनुमंत कदम (४८) या महिलेच्या अंगावरील १५ हजार रुपये किंमतीचे मंगळसुत्र व ५ हजार रुपयांच्या नोटा असलेली पर्स खेचुन पलायन केले. या घटनेपाठोपाठ रविवारी २९ ऑगस्ट रोजी रात्री पनवेलच्या ओरियन मॉलमधुन पत्नीसह स्कुटीवरुन काळुंद्रे गाव येथे परतणाऱ्या सागर गणेशकर (२७) या तरुणाच्या गळ्यातील २४ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारुंपैकी पाठीमागे बसलेल्या लुटारुने लुटून पलायन केले. या दोन्ही घटनांची कामोठे आणि पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

अपघातामुळे सापडला एक लुटारु

दरम्यान, गत २८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास पतीसह कोपरखैरणेतील गुलाबसन्स डेअरी जवळ शतपावली करण्यासाठी गेलेल्या जयश्री रामचंद्र शेडगे (३९) या महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन स्कुटीवरुन आलेल्या लुटारुंनी लुटून पलायन केले होते. मात्र यावेळी शेडगे दाम्पत्याने आरडा-ओरड करत दोघा लुटारुंचा पाठलाग केल्याने पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेली सदर लुटारुंची स्कुटी सेक्टर-१५ मध्ये उभ्या असलेल्या रिक्षाला धडकली. त्यामुळे दोघे लुटारु खाली पडल्याने स्कुटीवर पाठीमागे बसलेला लुटारु दागिने घेऊन पळून गेला. मात्र त्याचा साथिदार स्कुटी चालक राज सलीम शेख (२१) हा त्या भागातील नागरिकांच्या हाती लागला. त्यामुळे नागरिकांनी त्याची धुलाई करुन त्याला पोलिसांच्या स्वाधीन केले.राज शेख याला जबरी चोरीच्या गुन्हयाखाली अटक करण्यात आली असून दागिने घेऊन पळुन गेलेल्या दुसऱ्या लुटारुचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील शेळके यांनी दिली.

शिवसेनेच्या दणक्याने ग्राहकाला टिव्ही मिळाला परत

दै.रायगड नगरी । पनवेल

दूकानात खरेदी केलेला टिव्ही हा नादुरूस्त असल्याचे सांगूनसुद्धा ग्राहकाच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या आर्सी इलेक्ट्रॉनिक्स या दूकानावर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जाऊन जाब विचारताच तात्काळ त्यांनी सदर टिव्ही बदलून दिला आहे.

कमलेश यादव नावाच्या व्यक्तीने दोन वर्षा पूर्वी आर्सी इलेक्ट्रॉनिक्स, कळंबोली येथून हायर कंपनीचा ४० ईंचाचा टीव्ही विकत घेतला होता, ४ महिन्यातच तो टीव्ही बंद पडला. वारंवार तक्रार करून सुद्दा सर्विस सेन्टर वाले लक्ष देत नव्हते व आले तरी ते सारखे सर्विस चार्जे रु.१५००-२००० घेत होते.

कमलेश यादव यांनी हि बाब कळंबोली शिवसेना शहर समन्वयक गिरीश धुमाळ यांच्या कानावर घातली असता, गिरीश धुमाळ आणि त्यांचे सहकारी यांनी आर्सी इलेक्ट्रॉनिक्स मध्ये जाऊन मॅनेजर सोबत चर्चा करून कमलेश यादव यांना हायर कंपनीचा ४३ ईंचाचा नवीन टीव्ही मिळवून दिला.

कमलेश यादव यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी गिरीश धुमाळ यांचे मानले. त्या वेळेस शिवसैनिक विजय बाबा, उपतालुका संघटक सौ. टिया धुमाळ, शहर संघटक अक्षय साळुंखे, उपविभाग प्रमुख दीपक कोडवते, विभाग संघटक आशुतोष शेंडगे उपस्थित होते.

अजिंक्य नरेंद्र धनावडे यांचे सुयश

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान नगरपरिषद मध्ये वरीष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेले नरेंद्र रमेश धनावडे यांचा मुलगा अजिंक्य धनावडे याने मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे त्याने चौक येथील प्रभाकर पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेतले आहे.शाळेत असताना सुध्दा त्याने विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून अभ्यासात सुध्दा नेहमीच हुशार असल्याने सर्व शिक्षकांचे त्याच्यावर विशेष लक्ष होते. त्याला वाचनाची आवड असून

मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन माथेरानचे नाव उंचावले आहे. त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे आणि त्याने आगामी काळात सुध्दा आपल्या जीवनात यशाचा चढता आलेख पादाक्रांत करावा अशाप्रकारे अजिंक्यच्या पुढील वाटचाली साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या जात आहेत.

जाहिर सुचना

त्रिवेणी को. हौ. सोसायटी रजि.नं.RGD/PWL/HSG/TC/1938/2007-2008 विट सेंटरच्या मागे, बंदर रोड, पनवेल. या इमारतीचा पूर्नविकास करण्याचे विचाराधिन आहे. जागेचा फायनल प्लॉट क्र. ५१८/१७ असून सिटी सर्वे प्रॉपर्टी क्रमांक २२१ / अे,२२१/ अे१ २२१ / अे२ असा असून एकूण क्षेत्रफळ ५०२ चौ.मी. ऐवढे आहे. सबब ईच्छूक विकासकांनी दिनांक १०/०९/२०२१, पुर्वी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहचतील, अशा निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये त्रिवेणी को. हौ. सोसायटी प्लॅट क्रमांक १०१ येथे पाठवाव्यात. तद्नंतर येणाऱ्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा मंजूर करण्याचा अंतिम अधिकार संस्था कमिटी व सर्व सभासदांच्या मंजूरीने करण्यात येणार आहे.

त्रिवेणी को. हौ. सोसायटी
अध्यक्ष

मे.मुजावर सो.

अर्जदारातर्फे वकील
प्रल्हाद जी. खोपकर
निलेश द. हातमोडे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.८१९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१३/१०/२०२१

१) श्री.रोहित गोपाळ कडू
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.रणधिर गोपाळ कडू
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
१ व २ रा.न्हावे खाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.मनिषा सुर्यकांत म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.रांजणखार, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड
४) श्रीमती.अरुणा गोपाळ कडू
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.न्हावे खाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं.४ यांचे पती कै.गोपाळ सुदाम कडू हे दि.०१/०५/२०२१ रोजी मौजे : न्हावेखाडी, पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या आहेत. कै.गोपाळ सुदाम कडू यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. कै.गोपाळ सुदाम कडू यांचे मृत्यू समयी त्यांचे नावे मौजे : वहाळ, ता.पनवेल येथे खालील वर्णनाची जमीन मिळकत होती. सदर जमीन नवी मुंबई सिडको प्रकल्पाकरिता संपादीत झाली आहे.

२) कै.गोपाळ सुदाम कडू यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे सामाईक असलेली खालील वर्णनाची मिळकत आहे :-

मिळकतीचे वर्णन

सिडको कार्यालयातील वाटपपत्र क्र.सिडको/आंवित/
पुनःस्थापना/२०१५/४३६/VAH-1 दिनांक ०३/०६/२०१५

भूमी संपादन निवाडा क्र.	एकूण संपादीत जमिनीचा तपशिल		बांधकाम असल्यास त्याचा तपशिल		दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.)	दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णयानुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.)	भूखंड वाटपाचा तपशिल		
	भूमापन क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.	बांधकामा बद्दल पुनः स्थापने साठी वाटप करावयाचे क्षेत्र	बांधकाम धारकाचे नाव			सेक्टर क्र.	भूखंड क्र.	क्षेत्र चौ.मी.
VAHAL-1	३९४/१	०-७०-०	–	–	७,०००.००	१,१०२.५०	३	I-7	१११०

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार यांच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्री.रोहित गोपाळ कडू वगैरे ३ ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार मयत गोपाळ सुदाम कडू यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वारस दाखला मंजूर करेल आज दि.०१/०९/२०२१ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

ॲड.सुहासिनी एस. मोहिते

जाहीर नोटीस

मा.दिवाणी न्यायाधिश श्री.भाकरे वरिष्ठ स्तर पनवेल, यांचे कोर्टात पनवेल

चौ.अर्ज क्र.११४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/१०/२०२१

१) श्रीमती.स्वरणा रवींद्रन नायर
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.बिनॉय रवींद्रन नायर
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.मनिषा रवींद्रन नायर
वय : १८ वर्षे, धंदा : विद्यार्थी
४) श्रीमती.सीथालक्ष्मी अम्मा. के. एम.
वय : ७६ वर्षे, धंदा : काही नाही
सर्व रा.सी-३:२, सी विंग,
साई शास्त्र को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.२७, नवरंग बस स्टॉप जवळ,
सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई ४१०२१०
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार नं.१ यांचे पती, न.२ व ३ यांचे वडील व नं.४ यांचा मुलगा मयत श्री.के.एम.रवींद्रन यांचे निधन मुंबई येथे दि.२६/१२/२००६ रोजी झाले. मयत श्री.के.एम.रवींद्रन यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन
५० टक्के हिस्सा फ्लॅट नं.सी-३:२, सी विंग,
साई शास्त्र को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२७,
नवरंग बस स्टॉप जवळ, सेक्टर ११, खारघर,
नवी मुंबई ४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
क्षेत्रफळ ४४.८१ चौ.मी. बांधीव
एकूण रक्कम रु.५,०२,४९१/- पैकी (अक्षरी रुपये पाच लाख दोन हजार चारशे एक्क्यान्नव मात्र)
(५०% हिस्सा)
रक्कम रु.२,५१,२४५.५०/- (अक्षरी रुपये दोन लाख एकावन्न हजार दोनशे पंचेचाळीस आणि पन्नास पैसे मात्र)

वरील मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१ माहे ०९/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

उरण तालुक्यात ग्रामीण परिसरात घरगुती दहिहंडी संपन्न

दै.रायगड नगरी । उरण



तरूणांचा उत्साहाचा सण म्हणजे दहिहंडी. मात्र यावर्षी कोरोना आणि मुसळधार पावसामुळे या तरूण गोविंदांच्या उत्साहावर पाणी फेरले. तालुक्यातील गोविंदा पथकांनी देखिल शासनाच्या आदेशाचे पालन करीत कुठेही मोठ्या आणि सार्वजनिक दहिहंडीचे आयोजन करण्याचे टाळले होते.तालुक्यात अनेक ठिकाणी मात्र घरगुती दहिहंडी साजरी करण्यात आली.

लहान मुलांनी या दहिहंडीची मजा लुटली.यामध्ये उरण तालुक्यातील बोरी, पिरकोन, गोवठणे या ठिकाणची गोविंदाची पथके निष्णात आहेत. दरवर्षी ते अनेक ठिकाणी दहिहंडी फोडण्यासाठी जातात. चिरनेर गावात कुठेही सार्वजनिक दहिहंडी साजरी केली नसली, तरी परंपरा म्हणून सावडीच्या झाडावरची दहिहंडी टांगण्यात आली होती.

सावडीच्या झाडाची साल काढून त्याला आणखी चिकटपणा येण्यासाठी साबण, तेल वैगेरे लावून त्यावर चढून ही दहिहंडी फोडली जाते.

मल्लखांब खेळाडूंसाठी ही दहिहंडी म्हणजे पर्वणीच असते. चिरनेर गावातील मधिलपाडा येथील तरूणांनी कोरोनाचे नियम पाळत कुठेही गर्दी न करता ही दहिहंडी फोडली.

मा.इंदलकर साहेब

प्रो.जमा.६-२५ — अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात

क्रिमिनल एम.ए.नं.८५७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१४/१०/२०२१

श्री.प्रमोद एकनाथ घरत
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांची आई कै.पदुबाई एकनाथ घरत हिचा मृत्यू दि.०४/०७/१९७७ रोजी मु.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही. तसा पंचायत समितीने व ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड मधून अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात क्रिमिनल एम.ए.नं.८५७/२०२१ दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म मृत्यू नोंदणीबाबत कै.पदुबाई एकनाथ घरत मृत्यू दि.०४/०७/१९७७ बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे आईची दि.०४/०७/१९७७ मृत्यू नोंदीबाबत सर्टीफिकेट मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/०८/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

श्री.मुजावर साहेब कोर्ट २ कोर्ट

प्रो.जमा.६-१५ — अर्जदारांचे वकील : श्री.शैलेंद्र कुमार सिंह

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.९४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

कै. उषा जयरामदास पंजवानी
कै. जयरामदास हरिराम पंजवानी (मयत तर्फे वारस)
१) श्री. गुल जयरामदास पंजवानी (मुलगा) वय : ५६ वर्षे
पत्ता : फ्लॅट नं.४०१, ॲक्रोपॉलिस को.ऑप.हौ.सो.लि.,
प्लॉट नं.२८, सेक्टर ६, पाम बिच रोड,
नेरुळ (प.), नवी मुंबई ४००७०६
२) श्री.लक्ष्मण जयरामदास पंजवानी (मुलगा) वय : ५५ वर्षे
पत्ता : २२०२, रेजन्सी आयकॉन, प्लॉट नं.८१ बी,
रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई ४१०२१०
३) श्री.संतोषकुमार जयरामदास पंजवानी (मुलगा) वय : ५२ वर्षे
पत्ता : १९०२, रेजन्सी आयकॉन, प्लॉट नं.८१ बी,
रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर १९,
खारघर, नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.उषा जयरामदास पंजवानी हे दि.०१/०६/२०१९ रोजी मौजे : फ्लॅट नं.४०१, ॲक्रोपॉलिस को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.२८, सेक्टर ६, पाम बिच रोड, नेरुळ (प), नवी मुंबई ४००७०६ येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांचे पती कै. जयरामदास हरिराम पंजवानी हे दि.२५/०४/२०२१ रोजी मौजे : हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई ४००७०३ येथे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदार व्यक्ती त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

मयत कै.उषा जयरामदास पंजवानी आणि कै. जयरामदास हरिराम पंजवानी यांचे नावे २/३ हिस्सा व १/३ हिस्सा श्री.गुल जयरामदास पंजवानी यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन

मिळकतीचे वर्णन	क्षेत्रफळ
2/3 Share of Flat bearing No.1901, Regency Icon, Plot No.81B, Sector-19, kharghar, Navi Mumbai, Tal-Panvel, Dist-Raigad	Adm.area 64.952 Sq.Mtrs. Carpet+FB 8.775 Sq. Mtrs. + Balcony 3.987 Sq. Mtrs.+ Terrace 4.886 Sq. Mtrs.

कै.उषा जयरामदास पंजवानी आणि कै. जयरामदास हरिराम पंजवानी यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. ही सदरील अर्जात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदाराने मे.कोर्टात अर्ज केलेला आहे. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/०८/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

माथेरानमध्ये लहानग्या बालगोपाळांनी लुटला दही हंडीचा आनंद

दै.रायगड नगरी । माथेरान

दही हंडी म्हटले की तरूनाई मोठया उत्साहात दही हंडी फोडण्यासाठी तयार असते. कोरोनामुळे सर्वच सणा वर मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे सण असून नसल्या सारखे आहे. सर्व शांततेत सण साजरा करण्यात काहीही मज्जा राहिली नाही पण पारंपरिक हिंदू सण घरगुती का होईना ते ठीक ठिकाणी साजरे होत असतात. मोठी माणसे नाही पण बच्चे कंपनीनी गोपाळा गोपाळा म्हणत दहीहंडी फोडलीच. सकाळ पासून च पावसाने जोरदार हजेरी लावली होती, दुपारी ३ नंतर कमी झाला असला तरी रिमझिम पावसात लहानग्या बच्चे कंपनीना सोबत घेऊन मोठयानी ही त्यांच्या सोबत दही हंडी चा आनंद घेतला.

श्रीवर्धन येथे कोरोना प्रतिबंधनात्मक वस्तूंचे वितरण

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा श्रीवर्धनच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे कोरोना प्रतिबंधनात्मक वस्तूंचे वितरण शाखा व्यवस्थापक योगेश हरचंदानी व त्यांचे सहकारी सोनाजी बोबडे यांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ मधुकर ढवळे यांच्या कडे सुपूर्द करण्यात आले. कोरोना विरुद्ध लढा यशस्वी करण्यासाठी देण्यात आलेल्या वस्तूंमध्ये प्लस ऑक्सिमीटर थर्मल गन, सॅनिटायझर, मास्क, फेस शिल्ड, हॅन्ड ग्लोज, पी पी ई किट, एपरण, आदीं वस्तूंचा समावेश आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

इमारत पाडली, पुनर्बांधणी रखडली

पालीतील नवीन बस स्थानकाच्या इमारतीच्या बांधकामास मुहूर्त मिळेना

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील जीर्ण आणि जर्जर झालेल्या बस स्थानकाची इमारत ५ महिन्यांपूर्वी पाडण्यात आली आहे. मात्र त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस अजूनही सुरुवात झालेली नाही. जुन्या इमारतीचा राडारोडा देखील तसाच ठेवण्यात आलेला आहे. बस स्थानक इमारती अभावी प्रवासी व परिवहन कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे.

अनेक वर्षे धोकादायक स्थितीतल्या बस स्थानकाची इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारत उभी रहावी यासाठी नागरिकांकडून वारंवार राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी करण्यात येत होती. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांकडून उपोषणे व आंदोलने देखील करण्यात आली. २०१६ मध्ये रिपाइं रायगड जिल्हा सचिव रवींद्रनाथ यांनी नवीन बस स्थानकाकरिता आमरण उपोषण केले यावेळी त्यांच्या उपोषणाला व नागरिकांच्या मागणीला यश आले आणि पाली बस स्थानकाच्या नवीन इमारतीकरिता राज्य परिवहन महामंडळाकडून निधी उपलब्ध करण्यात आला. परंतु काही वर्षे जाऊन सुद्धा परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाच्या पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष करण्यात आले. दरम्यान रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी पुन्हा मार्च महिन्यात पाच दिवस उपोषण केल्यानंतर नवीन इमारत बांधण्यासाठी परिवहन महामंडळाकडून बस स्थानकाची धोकादायक इमारत जमीनदोस्त करण्यात आली. परंतु ५ महिने उलटून गेले तरी परिवहन महामंडळ नवीन इमारतीच्या पुनर्बांधणी कडे कानाडोळा करतांना दिसत आहे. त्यामुळे प्रवाशांचा मोठा हिरमोड झाला आहे. स्थानक आवारात कर्मचारी व प्रवाशांसाठी तात्पुरती शेड उभारण्यात आली आहे. मात्र तेथे सर्वांची गैरसोय होतांना दिसते. शिवाय दुकानदारांचे देखील नुकसान होत आहे.



सदरची मोडकळीस आलेली बस स्थानकाची इमारत पाडण्यात आली आहे. लवकरच नवीन इमारतीच्या बांधकामास सुरुवात करण्यात येईल. पावसामुळे काम थांबले आहे. परंतु संबंधित ठेकेदारास लवकरात लवकर काम चालू करण्यास सांगितले आहे.

अनघा बारटक्के,
परिवहन विभागीय नियंत्रक रायगड

पाली बस स्थानक हे खाजगी वाहनांचे पार्किंगचे ठिकाण बनले आहे. बस स्थानकात मोठाले खड्डे पडले आहेत. बस स्थानकाच्या आवारात दूषित पाणी साचून दुर्गंधी पसरली आहे. या दूषित घाण पाण्यातून प्रवाशांना मार्ग काढावा लागतो. निवारा शेड देखील पूर्णतः दूषित पाण्यात आहे. परिणामी प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रवाशांना शौचालयाची व्यवस्थित सोय नाही. मद्यपींमुळे स्थानक दारूचा अड्डा बनला आहे. स्थानकाजवळील नाल्यावरील एक स्लॅब तोडला असल्याने गाड्यांना प्रवेश करण्यास व बाहेर जाण्यास अडथळा निर्माण होतो. शिवाय या उघड्या नाल्यामुळे घाण व दुर्गंधी पसरते. सोमवारी (ता.३०) या नाल्यात एक बाईकस्वार देखील कोसळला होता.

नवीन बस स्थानक नुतानीकरणासाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ मध्ये मंजूर झाला होता. यामध्ये नवीन सुसज्ज भव्य इमारतीसह विविध सुविधा आदींचा समावेश होता. तसेच इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास जानेवारी २०२० पासून सुरुवात होणार होती. मात्र दीड वर्ष उलटूनही अजून एक वीटसुद्धा बसविण्यात आलेली नाही.

रायगड परिवहन विभागीय नियंत्रक यांच्याकडून बस स्थानकाचे तात्काळ पुनर्बांधणीचे लेखी पत्र देण्यात आले होते. परंतु आज ५ महिने उलटून गेले असून परिवहन महामंडळाकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. कदाचित त्यांना आलेला निधी पाली बस स्थानकासाठी वापरायचाच नाही. परंतु लवकर बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू केले नाही तर पुन्हा एकदा आमरण उपोषणास बसणार आहे.

रवींद्रनाथ ओव्हाळ,
रिपाइं रायगड जिल्हा सचिव

वीज महावितरणच्या कारभारावर आ. अनिकेत तटकरे यांनी केली नाराजी व्यक्त

दै.रायगड नगरी । रोहा

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कार्यालय रोह्याच्या कारभारावर आ. अनिकेत तटकरे यांनी कडक शब्दात ताशेरे मारले. गणेशोत्सवापर्यंत जनतेच्या समस्या सोडविल्या नाहीत तर कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशा शब्दात त्यांनी इशारा दिला. जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी आमदार अनिकेत तटकरे यांनी रोहा नगर परिषद कार्यालयात बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी उपस्थित नागरिक व कार्यकर्त्यांनी वीज कर्मचाऱ्यांची अरेरावी, प्रलंबित प्रश्न व अनियंत्रित कारभाराचा पाढाच आमदारांसमोर वाचला. वीज कर्मचारी हे जनतेच्या समस्यांप्रती गंभीर नसल्याचे विज ग्राहक सांगत आहेत. विशेषतः महा वितरण काही कर्मचाऱ्यांवर वचक राहिला नसल्याचे कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणुन दिले.या अगोदरच्या दोन आढावा सभांमधील प्रश्नांची पुर्तता झालेली आढळून आली नाही.त्यामुळे संतप्त झालेल्या आमदार अनिकेत तटकरे यांनी वीज वितरण अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. आगामी काळात सणासुदीचे दिवस येत आहेत. आपण आपला कारभार सुधारा, जनतेचे प्रश्न सुटले नाहीत तर लोकप्रतिनिधी म्हणून मला योग्य ती कारवाई करावी लागेल. कार्यकर्ते आक्रमक झाले तर आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करतील. ती वेळ येऊ देऊ नका असा इशाराही आम. अनिकेत तटकरे यांनी यावेळी दिला. राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष जयवंत मुंडे यांनी याविषयी संतप्त भावना व्यक्त केली असून आगामी काळात वीज वितरण कार्यालय रोह्याच्या विरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

पनवेल ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरावस्था

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातून पनवेल मध्ये रस्त्याची अवस्था अतिशय खराब झाली आहे. तालुक्यातील प्रत्येक गावातील मार्गावरील रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. खड्यामुळे रात्रीच्या वेळी चा प्रवास करणे धोक्याचे झाले आहे. हे खड्डे बुज़वून रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी ग्रामीण भागातील नागरिकांनी केली आहे.

पनवेल तालुक्यातील सुकापूर- भगतवाडी आणि विहीघर ते कोप्रोली रस्ता, सुकापूर, वाकडी, खानाव मार्गे मोरबा, तळोजा औधोगिक वसाहत रस्ता, तसेच नवीन पनवेल कानपोली, वलप, टेंभोडे, वलवली मार्गे औद्योगिक वसाहतीमध्ये जाणारा रस्ता. सुकापूर,आकुर्ली, चिपळे, नेरे, वाजे रस्ता. तसेच देहरंग धरणाकडे जाणारा रस्ता. तसेच तळोजा एमआयडीसी ते नितळस रस्ता, कोन गावावरून रसायनीला जाणारा रस्ता या पनवेल ग्रामीण भागातील पनवेल शहराला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. तळोजा नोड मधील घोट, पेंधर, घोट कॅम्प या गावात जाणाऱ्या रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. कोरोना काळात निर्बंधांमुळे रहदारीवर परिणाम झाला होता. परंतु निर्बंधात शिथीलता झाल्या नंतर शहरासह ग्रामीण भागातील रहदारी ही वाढली आहे. त्यामुळे रस्त्याच्या दुरावस्थेचा फटका रात्रीच्या अंधारात जास्त होत आहे. काही ठिकाणचा रस्ता पावसाने वाहून गेला आहे. परंतु तुरळक डागडुजी सोडली तर कुठल्याही प्रकारची कामे झाली नाहीत. खराब रस्त्यामुळे दुचाकीस्वार रिक्षाचालक, एसटी व इतर वाहनांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. येत्या १० सप्टेबर रोजी गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. गणरायांचे आगमन घरोघरी होणार आहे. तरी गणेशोत्सवापूर्वी या रस्त्याची डागडुजी करून घ्यावी. या संदर्भातील निवेदन ठिक ठिकाणच्या नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल याना दिला आहे.

रक्कम दुप्पट करुन देण्याच्या बहाण्याने फसवणूक ; आरोपींचा शोध सुरु

पनवेल दि. १ (वार्ताहर) : फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवलेली रक्कम चार वर्षात दुप्पट करुन देण्याचे अमिष दाखवून एका भामटयाने पनवेल व आजुबाजुच्या भागातील अनेक व्यक्तींकडून लाखो रुपये उकळून त्यांची फसवणुक केल्याचे उघडकिस आले आहे. निनाद खानावकर असे या भामटयाचे नाव असून पनवेल तालुका पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेला आरोपी निनाद खानावकर हा तळोजा भागातील नावडे परिसरात राहण्यास असून त्याने २०१६ मध्ये दिशा फॉरेक्स ट्रेडिंग ॲन्ड इन्वेस्टर्स या नावाने कंपनी स्थापन केली होती. त्यानंतर त्याने नावडे परिसरात कार्यालय थाटून त्याच्या कंपनीतील गुंतवणुकीच्या योजनांची जाहिरातबाजी केली होती. फिक्स डिपॉझीट म्हणून गुंतविलेली रक्कम ४ वर्षात हमखास दुप्पट करुन देण्याची त्याने योजना त्याच्या कार्यालयातून सुरु केली होती. त्याने केलेली जाहिरातबाजी व दाखविलेला विश्वास याला भुलून पनवेल व आजुबाजुच्या भागातील अनेक व्यक्तींनी त्यांच्याजवळ असलेली लाखो रुपयांची रक्कम निनाद खानावकर याच्या कंपनीत फिक्स डिपॉझिट मध्ये गुंतविली होती.

दरम्यान, गुंतवणुकिच्या या योजनेला २०२० मध्ये चार वर्षे पुर्ण झाल्यानंतर काही गुंतवणुकदारांनी निनाद खानावकर याच्या कार्यालयात दुप्पट पैसे घेण्यासाठी धाव घेतली. मात्र त्याचे कार्यालय बंद असल्याचे आढळुन आले. त्यामुळे गुंतवणुकदारांनी निनादच्या घरी जाऊन त्याच्याकडे आपल्या रक्कमेबाबत विचारपुस केल्यानंतर त्याने करोनाचे कारण सांगून दोन महिन्यात त्यांना त्यांची रक्कम देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे गुंतवणुकदारांनी २ महिन्यांनंतर त्याला संपर्क साधला असता, त्याने पैसे देण्यास टाळाटाळ करुन उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच त्याने पैसे परत देणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर फसवणुक झालेल्या गुंतवणुकदारांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात याबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणाचा प्राथमिक तपास करुन आरोपी निनाद खानावकर याच्या विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी निनाद खानावकर याच्या दिशा फॉरेक्स ट्रेडिंग ॲन्ड इन्वेस्टर्स या कंपनीत प्रमोद पवार यांनी १ लाख रुपये, काळुराम पाटील- २ लाख ५० हजार रुपये, प्रमोद पाटील ६ लाख रुपये, कवीता शेळके १० लाख रुपये, ऋतुजा शेळके ५ लाख रुपये गुंतविले आहेत. याशिवाय निनाद खानावकर याने अनेक लोकांकडून अशाच पद्धतीने मोठी रक्कम उकळली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांकडून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच जिल्हा सामान्य रूग्णालय संबंधीची

बांधकाम-दुरूस्तीची कामे कालबद्ध नियोजनाने प्राधान्याने पूर्ण करावीत : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच जिल्हा सामान्य रूग्णालय संबंधीची बांधकाम -दुरुस्तीची कामे कालबद्ध नियोजनाने प्राधान्याने पूर्ण करावीत, असे निर्देश पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज (दि.१ सप्टेंबर) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित बैठकीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील दुरुस्ती कामाबाबतचा आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीत जिल्हा सामान्य रूग्णालयातील प्रशासकीय इमारत बांधकाम, जिल्हा सामान्य रूग्णालयामधील इतर बांधकामे, दुरूस्ती, जिल्हा सामान्य रूग्णालयामधील व्याख्यान कक्ष व ग्रंथालयाचे बांधकाम तसेच परिचारिका निवासस्थान दुरुस्ती आणि आरसीएफ वसाहतीमधील इमारतींची दुरूस्ती या विषयांबाबतचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देताना सांगितले की, जिल्ह्याच्या दृष्टीने आरोग्य यंत्रणा व आरोग्य सेवा बळकट करणे ही महत्त्वाची बाब आहे. त्यादृष्टीने सर्व प्रकारची मदत केली जाईल, निधी अपुरा पडू दिला जाणार नाही. मात्र ही कामे कालबद्ध नियोजन करून प्राधान्याने लवकरात लवकर पूर्ण व्हायला हवीत.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अधीक्षक अभियंता श्री.राजाराम गोसावी, अलिबाग कार्यकारी अभियंता रत्नाकर बामणे, पनवेल कार्यकारी अभियंता रुपाली पाटील, प्रांताधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार सचिन शेजाळ, आरसीएफ चे अधिकारी प्रमोद देशमुख, संतोष वाझे, शाखा अभियंता श्री.बागूल, श्रीमती धनश्री लोमटे आदी उपस्थित होते.

ट्रेलरच्या धडकेने गाडीतील तिघे जण जखमी

दै.रायगड नगरी । पनवेल

आपल्या ताब्यातील ट्रेलर बेदरकारपणे चालवून मारुती स्विफ्ट डिजायर गाडीस धडक देऊन केलेल्या अपघातात गाडीतील तिघे जण जखमी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील कल्हे गावाच्या हद्दीत घडली आहे.

ट्रेलरचालक गणेश घोरपडे हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर घेऊन तालुक्यातील कल्हे गाव येथून जात असताना त्याने मारुती स्विफ्ट डिजायर गाडीस पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात निखिल पाटील (वय-२९), स्वाती पाटील (वय-५०) व कैलास पाटील (वय-५७) हे तिघे जखमी झाले आहेत. तसेच त्यांच्या गाडीचेही नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पत्ता	झाडांचा प्रकार व संख्या	झाडे तोडण्याचे कारण
१	सेक्रेटरी, श्री.सतीश नाथा आंबवडे, ३०२, मैत्रेय सोसायटी, प्लॉट नं.१८ ए, सेक्टर १, खांदा कॉलनी न्यू पनवेल (प.)	२ नारळ	पनवेल महानगरपालिका हद्दीतील मैत्रेय सोसायटी, प्लॉट नं.१८ ए, सेक्टर १, खांदा कॉलनी, न्यू पनवेल (प.) येथील २ नारळाची झाडे ही धोकादायक अवस्थेत असल्याने कधीही पडण्याची भिती असून त्यामुळे जिवीतहानी होवू शकते. तसेच वाहनांची सुद्धा हानी होवू शकते. नारळ डोक्यात पडण्याच्या घटना झाल्या आहेत. तरी २ नारळाची झाड तोडणेकामी परवानगी बाबत.
२	न्यू मुंबई इंग्लिश स्कूल, कळंबोली, प्लॉट नं.१४, सेक्टर १०, जोग सिडको कॉलनी, कळंबोली, नवी मुंबई	१ रेन ट्री	पनवेल महानगरपालिका हद्दीतील सेक्टर १० जोक मधील गार्डनच्या लगत आमची न्यू मुंबई इंग्लिश स्कूल विद्यालय आहे. विद्यालयालगत असलेल्या गार्डनमधील झाडे खुप मोठी झाली आहेत. त्यांच्या फांद्या शाळेच्या भिंती पर्यंत आल्या आहेत. त्याच झाडावरुन काही सरपटणारे विषारी उभयचर प्राणी शाळेत येतात. त्यामुळे शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या झाडाच्या फांद्यामुळे शाळेच्या भिंतीलाही नुकसान होत आहे. व ०१ रेन ट्री झाडाचे खोड पोकळ झाले आहे. तरी १ रेन ट्री झाड तोडणेकामी परवानगी बाबत.
३	श्रीम.रेखा रमेश भोसले, मु.भिंगारी, कांदेवाडी, ता.पनवेल, जि.रायगड	१ आंबा	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड मधील भिंगारी कांदेवाडीतील पनवेल महानगरपालिकेमार्फत आंब्याचे झाडाच्या सर्व फांद्याची छाटणी करून अर्धे झाड पनवेल महानगरपालिकेने तोडून काढले होते व झाडाचा काही भाग व खोड शिल्लक ठेवले होते. झाडाच्या १० ते १२ फूट इंच भाग व खोड शिल्लक हा आता सुकलेल्या अवस्थेत राहिला आहे. झाडाचा राहिलेला शिल्लक भाग हा आता पूर्णपणे सुकल्यामुळे अर्जदार यांच्या शौचालयावर पडण्याची शक्यता आहे. तसेच बाजूच्या घरावर पडून त्या घराचे सांडपाण्याचे पाईप व चेंबर फुटण्याची व तुटण्याची शक्यता आहे. तरी १ आंब्याचे झाड तोडणेकामी परवानगी बाबत.

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.५७/३७९/२०२१
दिनांक : ०१/०९/२०२१

सही/-
सहा.आयुक्त
तथा
वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका